RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक ९१] बुधवार, ऑक्टोबर १४, २०२०/आश्विन २२, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २४३

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ ऑक्टोबर २०२०

आदेश

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३.
महाराष्ट्र सर्वसाधारण वाकखंड, अधिनियम, १९०४.

क्रमांक संकीर्ण १५२०/प्र.क्र. ९६/६-अे.— ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ (१९८३ चा महा. ४१) याच्या कलम १७ च्या पोट-कलम (२क) च्या खंड (ड) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, काढलेला शासन आदेश, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र. एजीयू-२०१०/प्र.क्र. ७१/७-ए, दिनांक २१ जुलै २०१० (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त आदेश" असा केला आहे) याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, कुलगुरु म्हणून नियुक्ती करण्यासाठी एखाद्या व्यक्तीने धारण करावयाची शैक्षणिक अर्हता व अनुभव विनिर्दिष्ट केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, कुलगुरु म्हणून नियुक्तीसाठी एखाद्या व्यक्तीने धारण करावयाचा विशिष्ट अनुभव विनिर्दिष्ट करून पात्रता शर्तींमध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ (१९८३ चा महा. ४१) याच्या कलम १७ च्या पोट-कलम (२क) च्या खंड (ड) तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण वाकखंड, अधिनियम, १९०४ (१९०४ चा १) याच्या कलम २१ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, कुलपतींशी विचारविनिमय करून, याद्वारे, उक्त आदेशात पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामध्ये, त्यास जोडलेल्या अनुसुचीमधील, भाग अ मध्ये, परिच्छेद ३ ऐवजी, पुढील परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

"३. विभागप्रमुखाच्या किंवा समकक्ष पदाच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा पदावरील किमान ३ वर्षांच्या प्रशासकीय अनुभवासह प्राध्यापक म्हणून किमान १० वर्षांचा अनुभव."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एकनाथ डवले,
शासनाचे सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBUNDARY, DAIRY DEVELOPMENT AND FISHRIES DEPARTMENT

Mantralaya Annex, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 13th October 2020.

*Order*

MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.
MAHARASHTRA GENERAL CLAUSES ACT, 1904.

No. Sankirna 1520/C.R. 96/6-A.–Whereas, by the Government Order, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department No. AGU.2010/C.R.71/7-A, dated the 21st July 2010 (hereinafter referred to as "the said Order"), issued in exercise of the powers conferred by clause (*d*) of sub-section (*2C*) of section 17 of the Maharashtra Agricultural Universities (*Krishi Vidyapeeths*) Act, 1983 (Mah. XLI of 1983), the Government of Maharashtra has, in consultation with the Chancellor, specified the educational qualifications and experience to be possessed by a person for the appointment as Vice-Chancellor ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to modify the eligibility conditions by specifying the specific experience to be possessed by a person for appointment as Vice-Chancellor ;

Now, therefore, in exercise of the power conferred by the clause (*d*) of sub-section (*2C*) of section 17 of the Maharashtra Agricultural Universities (*Krishi Vidyapeeths*) Act, 1983 (Mah. XLI of 1983) read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904), and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, in consultation with the Chancellor, hereby amends the said Order as follows, namely :–

In the said Order, in the Schedule appended thereto, in Part 'A' for paragraph 3 the following shall be substituted, namely,–

"3. Atleast 10 years experience as Professor including minimum 3 years administrative experience not below the rank of Head of the Department or Equivalent post. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

EKNATH DAWALE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.